राष्ट्रीय सौर माघ शके १९२८ | ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
दूरभाष क्र. २४४७७६९१ / २४४७८०९५ | फेब्रुवारी २००७

# इ. ५वी साठी प्रवेशासंबंधी सूचना

**प्रस्तावना** :- ज्ञान प्रबोधिनीचे उद्देश, शैक्षणिक धोरण व विविध उपक्रम यासंबंधी माहिती अन्य पत्रकामध्ये आहे. येथे मुख्यत: प्रवेशासंबंधीच्या सूचना व माहिती आहे. या प्रशालेत विद्यार्थी निवडताना त्याची / तिची प्रवेशपरीक्षा घेतली जाते. त्यासाठी मुख्यत: बुद्धिमापन कसोट्या आणि निवडक शालेय विषयांच्या परीक्षा घेतल्या जातात.

इ. ५ वी तील प्रवेशासाठी परीक्षेचे स्वरूप

**१) प्रवेशपरीक्षेचे माध्यम** : ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ही जरी मिश्र माध्यमाची शाळा असली तरी इ. ५ वीत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी विद्यार्थ्यांच्या सोयीने मराठी किंवा इंग्रजी या दोन्ही माध्यमांमध्ये प्रवेशपरीक्षा घेण्याची सोय असते. पालकांनी त्यांच्या पाल्यांना परीक्षेसाठी जे माध्यम सोयीचे वाटेल तेच प्रवेशाच्या अर्जावर लिहावे. तसेच प्रवेशपत्रावर इंग्लिश किंवा मराठी हा गट बरोबर लिहिला आहे ना याची खात्री करून घ्यावी. प्रवेशपत्रावर यासंबंधी चुकीची नोंद झाल्यास नंतर अनेक अडचणी येतात.

**२) परीक्षेचे विषय :** या परीक्षेत एकूण दोन प्रकारच्या कसोट्या असतात.

१) बुद्धिमापन कसोट्या २) शालेय विषयांच्या कसोट्या

या सर्व कसोट्या लेखी असतात. या सर्व कसोट्यांची कल्पना इ. ४ थी च्या शिष्यवृत्ति-परीक्षेच्या पुस्तकांवरून येऊ शकेल. बुद्धिमापन कसोट्यांवर अधिक गुण मिळविण्यासाठी पूर्वतयारी किती केली आहे. त्यापेक्षा प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांची मन:स्थिती कशी आहे याला पालकांनी अधिक महत्त्व द्यावे. या परीक्षेसंबंधी विविध सूचना परीक्षेपूर्वी परीक्षक देत असतात. त्या सूचनांकडे लक्ष देऊन एकाग्रतेने परीक्षा सोडविण्याइतकी प्रसन्न मन:स्थिती पाल्याची नसेल तर त्याला परीक्षेत पुरेसे यश मिळू शकणार नाही याची पालकांनी नोंद घ्यावी.

शालेय विषयांच्या कसोट्यांमध्ये गणित हा विषय असतो. इ. ४ थी पर्यंतचा शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यासक्रम यात असतो.

**३) लेखी परीक्षेनंतरची प्रक्रिया :** वरील २ प्रकारच्या कसोट्यांमध्ये ज्यांना समाधानकारक गुण मिळतात अशा विद्यार्थ्यांना नंतर आणखी एका चाचणीसाठी व मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. त्यासंबंधीचा लेखी निर्णय प्रवेशपरीक्षेनंतर सुमारे तीन आठवड्यांनी प्रवेशद्वारावरील सूचना फलकावर लावला जातो. परगावच्या पालकांनी त्यावेळी दूरध्वनीवरून चौकशी केल्यास त्यांना निर्णय कळविला जातो. यावर्षी हा निर्णय मंगळवार दि. २० मार्च २००७ या दिवशी संध्याकाळी ५.०० वाजता लागेल. त्यानंतर होणारी चाचणी व मुलाखती रविवार दि. २५ मार्चला होतील. मंगळवार दि. १७ एप्रिल रोजी संध्याकाळी ५.०० वाजता अंतिम निर्णय प्रकट केला जाईल.

**४) अन्य सूचना :**

४.१) ***मुलींसाठी हिरव्या रंगाच्या*** व ***मुलांसाठी पिवळ्या रंगाच्या*** अर्जावर पाल्यासंबंधी माहिती लिहावी.

४.२) पूर्ण भरलेले अर्ज प्रशालेच्या कार्यालयात सादर केल्यानंतर प्रवेशपरीक्षेसाठीचे प्रवेशपत्र दिले जाईल. प्रवेश-परीक्षेला येताना विद्यार्थ्याने ते प्रवेशपत्र आणणे आवश्यक आहे.

४.३) प्रवेशपरीक्षेसह अर्ज व माहितीपत्रकाची किंमत रू. १५०/- असेल. परगावच्या लोकांनी रू. १७५/- चा डिमांड ड्राफ्ट प्राचार्य ज्ञान प्रबोधिनी प्रशाला या नावाने पाठविल्यास त्यांना सर्व साहित्य व पावती पाठविली जाईल.

४.४) इ.स.२००७ मध्ये नवप्रविष्टांसाठी वार्षिक शुल्क रू. ८०००/- इतके आहे. त्याशिवाय रू. ५००/- सावधानता शुल्क भरावे लागेल. काही कारणाने पालकांनी प्रवेश रद्द केल्यास पैसे परत केले जाणार नाही.

४.५) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चासाठी काही प्रमाणात शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था आहे अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी प्रवेश घेताना कार्यालयात चौकशी करावी.

४.६) अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक २० फेब्रुवारी आहे. अर्ज प्रशाला कार्यालयात खालील वेळांत स्वीकारले जातील.

सोम ते शुक्र - ११.३० ते २.३० शनि. - ८.३० ते ११.०० (सुट्ट्या सोडून)

**५) प्रवेश अर्ज** www.prashala.jnanaprabodhini.org या संकेतस्थळावरून डाउनलोड करून घेता येतील.

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

## इ. ५वी प्रवेश परीक्षेविषयी पालकांना सूचना - फेब्रुवारी २००७

१. रवि. दि. ४ मार्च २००७ रोजी पहिल्या सत्रातील विद्यार्थ्यांची इ.५वी प्रवेश परीक्षा ठीक १०.०० वाजता सुरू होईल. विद्यार्थ्यांनी किमान ९.१५ वाजता चाचणीसाठी येणे आवश्यक आहे. दुसऱ्या सत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा ठीक १.०० वाजता सुरू होईल. विद्यार्थ्यांनी किमान १२.१५ वाजता चाचणीसाठी येणे आवश्यक आहे.

२. पालकांना वर्गामध्ये जाण्यास अनुमती नसते. सर्व विद्यार्थ्यांना पाचव्या मजल्यावरील सभागृहात रांगांमध्ये बसवून घेतले जाते आणि नंतर एकेका गटाला रांगेने चाचणीसाठी वर्गामध्ये नेले जाते.

३.योग्य रांगेत क्रमांकावर बसवून घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्याला त्याच्या प्रवेशपत्रावरील गटक्रमांक आणि आसन-क्रमांक चांगल्या प्रकारे लक्षात असणे आवश्यक असते. तसेच ते प्रवेशपत्रही त्याच्याजवळ असणे आवश्यक असते. (पावती नसली तरी चालेल. प्रवेशपत्र मात्र अत्यावश्यक आहे.)

४. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हातात प्रवेशपत्र देऊन त्याला प्रबोधिनीच्या वास्तूत सोडल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या अडीअडचणींची काळजी प्रबोधिनीतील अध्यापक आणि कार्यकर्ते घेत असतात. पालकांनी चौकात गर्दी केल्यास विद्यार्थ्यांना सूचना देणे अवघड होते आणि विद्यार्थी भांबावून जातात. त्यामुळे ९.३० नंतर चौकात थांबू नये; अथवा तळमजल्यावरील उपासना मंदिरात थांबावे.

५. चाचणीसाठी येताना विद्यार्थ्याजवळ खालीलप्रमाणे साहित्य असलेले दप्तर असावे.

१) लिहिण्यासाठी २ पेन्सिली (पेन नको) २) पेन्सिलला टोक करण्याचे यंत्र

३) मधल्या सुट्टीत खाण्यासाठी डबा ४) प्रवेशपत्र

६. चाचणी संपल्यानंतरही विद्यार्थ्यांना रांगेने तळमजल्यामधील चौकापर्यंत नेले जाते. आपल्या पाल्याला घेऊन जाण्यासाठी प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांच्या पालकांनी १.०० वाजता तर दुसऱ्या सत्रातील विद्यार्थ्यांच्या पालकांनी ४.०० वाजता यावे.

७. डबा विसरला असेल तर वर्गामध्ये डबा पाठविण्याची व्यवस्था होऊ शकत नाही. तथापि चौकात खाद्यपदार्थांची पाकिटे विकत मिळू शकतील; ती वर्गामध्ये पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.


***ज्ञानप्रबोधिनीची शैक्षणिक नियतकालिके***

***छात्र प्रबोधन***

- ज्ञानप्रबोधिनीचे कुमारांसाठी आकर्षक, अभिनव मासिक!
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाहिलेले मासिक
- ज्ञान, मनोरंजन, कृती, विचार यांचा अनोखा समन्वय जपणारे मासिक
- सभासदांसाठी विविधांगी उपक्रम
- सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचे अनेक पुरस्कार प्राप्त
- वार्षिक वर्गणी रु. १५०/- सभासद व्हा!

***'प्र'शिक्षक***

- प्रयोगशील-प्रतिभासंपन्न शिक्षकांसाठी ज्ञान प्रबोधिनीचे अभिनव द्वैमासिक !
- कृतिशील शिक्षकांची धडपड अनेकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम.
- आपल्याही शाळेत करून पाहावे असे वाटेल अशा शालेय आणि सहशालेय उपक्रमांचा स्रोत.
- शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी 'प्र'शिक्षकाचे
- वार्षिक देणगी मूल्य रू. ६०/-